REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 9 | JUNE - 2026

# प्राचीन भारतीय ज्ञानाचे सद्य:स्थितीत शिक्षण क्षेत्रात उपयोजन

डॉ. उन्नती संजय चौधरी
खिरोदा ता. रावेर जि. जळगाव.

**गोषवारा:**



**प्राचीन** भारतीय शिक्षण व्यवस्था ही ज्ञानपरंपरेने समृद्ध असून, ती केवळ औपचारिक शिक्षणापुरती मर्यादित नव्हती तर, नैतिक, आध्यात्मिक आणि व्यावहारिक ज्ञानाचा समन्वय साधणारी होती. गुरुकुल शिक्षण व्यवस्थेत विद्यार्थ्यांना नैतिक मूल्ये, शारीरिक कौशल्ये आणि आत्मशिस्त शिकवली जात असे. प्राचीन भारतीय विद्यापीठे तक्षशिला व नालंदा यांसारख्या विद्यापीठांनी भारताच्या शैक्षणिक वारशाला जगनमान्यता मिळवून दिली. याठिकाणी एकूण ६४ कलांच्या अध्ययनाबरोबरच वेद, उपनिषदे, योग, आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र, अर्थशास्त्र आणि नाट्यशास्त्र यांसारख्या विषयांमध्ये मौलिक संशोधन होत होते. ज्यांची जागतिक स्तरावर ख्याती होती आणि म्हणून जगभरातून विद्यार्थी अभ्यासक या विद्यापीठांमध्ये विविध कला आणि विद्यांचा अभ्यास करण्यासाठी येत असत. आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त आणि भास्कराचार्य यांसारख्या विद्वानांनी गणित व खगोलशास्त्रात योगदान दिले, तर पतंजलीच्या योगसूत्रांमध्ये मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी योगाचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. संस्कृत भाषेचा विज्ञान व तंत्रज्ञानाच्या अभ्यासावर प्रभाव होता, तर भरतमुनींच्या नाट्यशास्त्राने नाट्य, नृत्य व संगीत शिक्षणाची मूलभूत तत्त्वे मांडली. आधुनिक शिक्षण व्यवस्थेत तंत्रज्ञान आणि व्यावसायिक कौशल्यांचा समावेश झाला असला तरी, मूल्याधारित शिक्षण, योग, ध्यानधारणा आणि भारतीय तत्त्वज्ञान यांचा पुनर्विचार होणे गरजेचे आहे. ही गरज लक्षात घेवून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये मातृभाषेतून शिक्षण, CBCS, मूल्यमापनाचा बदलता दृष्टिकोन आणि मूल्याधारित शिक्षणास महत्त्व दिले गेले आहे, ज्यामुळे प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेचा आधुनिक शिक्षण व्यवस्थेत समावेश होऊन ती अधिक प्रभावी व समाजोपयोगी ठरण्याची गरज अधोरेखित होते.

**Keywords:** भारतीय संस्कृती, उपयोजन, प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था, नीतिशास्त्र.

## प्रस्तावना:

प्राचीन भारतीय संस्कृती ही ज्ञानपरंपरेने समृद्ध असून, तिची शिक्षण व्यवस्था ही जगातील सर्वात प्राचीन आणि प्रभावी शिक्षण व्यवस्थांपैकी एक मानली जाते. प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था केवळ औपचारिक शिक्षणावर आधारित नसून,

ती आध्यात्मिक, नैतिक, आणि व्यावहारिक ज्ञानाच्या समन्वयाने बालकाच्या सर्वांगीण विकासावर भर देणारी होती. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, योग, आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र आणि तर्कशास्त्र यांसारख्या ग्रंथांमध्ये ज्ञानाचे व्यापक क्षेत्र समाविष्ट आहे. गुरुकुल शिक्षण पद्धती ही प्राचीन भारतातील शिक्षणाचा पाया होती, जिथे विद्यार्थी गुरुंच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेत असत. उपनयन संस्कारापासून ते उपदान संस्कारापर्यंत शिष्याला गुरूगृही त्या कुटुंबाचा एक सदस्य म्हणून वास्तव्य करावे लागत असे. या शिक्षण पद्धतीत केवळ पाठ्यपुस्तकांचे ज्ञान नव्हे, तर नैतिक मूल्ये, शारीरिक कौशल्ये आणि आत्मशिस्त शिकवली जात असे. तसेच, तक्षशिला आणि नालंदा यांसारख्या जगप्रसिद्ध विद्यापीठांनी भारताच्या शैक्षणिक वारशाला जागतिक स्तरावर मान्यता मिळवून दिलेली होती.

आजच्या आधुनिक शिक्षण व्यवस्थेमध्ये तंत्रज्ञानाचा वापर वाढत असला तरी, संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि मूल्याधिष्ठित शिक्षणासाठी प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीतील तत्त्वे आज ही तितकीच उपयुक्त ठरू शकतात. योग व ध्यानधारणा, वैदिक गणित, पंचतंत्रातील कथांद्वारे नीतिशिक्षण, पर्यावरणपूरक जीवनशैली आणि सर्वसमावेशक शिक्षणपद्धती या संकल्पना आधुनिक शिक्षणात समाविष्ट केल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास तर साध्य करता येईलच परंतु विद्यार्थी कौशल्य संपादन करून आत्मनिर्भरही बनू शकेल. अशा प्रकारे, प्राचीन भारतीय ज्ञानाचा शिक्षण क्षेत्रात प्रत्यक्ष उपयोग करून आपण सद्य:स्थितीतील शिक्षण व्यवस्था अधिक प्रभावी, सुसंस्कृत, समाजोपयोगी आणि राष्ट्र निर्माण करणारी कशी बनवू शकतो, याचा विचार करणे आवश्यक आहे. शिक्षण हे केवळ माहिती मिळवण्याचे साधन नसून, व्यक्तिमत्त्व विकास आणि समाज सुधारणेचा ते एक प्रभावी मार्ग आहे. आधुनिक शिक्षण व्यवस्थेत तंत्रज्ञान आणि व्यावसायिक कौशल्यांचा समावेश झाला असला, तरी मूल्याधिष्ठित शिक्षण, ध्यान व योग यांसारख्या प्राचीन संकल्पनांचा पुनर्विचार केला जात आहे. ही गरज लक्षात घेवून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये मातृभाषेतून शिक्षण, CBCS, मूल्यमापनाचा बदलता दृष्टिकोन आणि मूल्याधारित शिक्षणास महत्त्व दिले गेले आहे, ज्यामुळे प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेचा आधुनिक शिक्षण व्यवस्थेत समावेश होऊन ती अधिक प्रभावी व समाजोपयोगी ठरेल.

भारतीय परंपरेशी निगडित तत्त्वांना महत्त्व दिले गेले आहे त्यामुळे प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीतील तत्वज्ञान व तत्त्वे आधुनिक शिक्षण व्यवस्थेत प्रभावीपणे लागू करता येऊ शकतात, विशेषतः चरित्र घडवणे, संवाद कौशल्ये, विश्लेषणात्मक विचारसरणी आणि तणाव व्यवस्थापन यांसाठी प्राचीन शिक्षण प्रणालीतील योग, ध्यान आणि नीतिशास्त्र हे महत्त्वाचे घटक ठरू शकतात. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात भारताच्या प्राचीन ज्ञानाचा प्रभावी वापर केल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल आणि शिक्षण अधिक समतोल, व्यावहारिक व नैतिकदृष्ट्या बळकट होईल.

## प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा:

भारताची ज्ञान परंपरा जगातील सर्वात प्राचीन व समृद्ध परंपरांपैकी एक मानली जाते. ही परंपरा केवळ शास्त्र आणि तंत्रज्ञानापुरती मर्यादित नव्हती, तर जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारी होती. नालंदा, तक्षशीला, वल्लभी यांसारख्या जगविख्यात विद्यापीठात ६४ कलांचे शिक्षण दिले जात होते. भारतीय तत्त्वज्ञान, वेद, उपनिषद, आयुर्वेद, योग, गणित, खगोलशास्त्र, वास्तुशास्त्र, संगीत, कला आणि राज्यशास्त्र यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये भारताने मौलिक संशोधन व योगदान दिले आहे. प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा पुढीलप्रमाणे-

### 1) वेद आणि उपनिषदांमधील ज्ञान

वेद हे भारतीय ज्ञान परंपरेचे सर्वात जुने आणि महत्त्वाचे स्रोत आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद हे चार वेद प्राचीन भारतीय ज्ञानाचे आधारस्तंभ मानले जातात. यामध्ये सृष्टीचे रहस्य, नैसर्गिक शक्ती, यज्ञसंस्था, नीतिशास्त्र, समाजव्यवस्था आणि विज्ञान यांसारख्या विषयांवर चर्चा आहे. उपनिषदे ही वेदांचा तात्त्विक गाभा असून आत्मज्ञान, ब्रह्म आणि मोक्ष यांसारख्या संकल्पनांचे स्पष्टीकरण देतात.

### 2) भारतीय तत्त्वज्ञान आणि धार्मिक ग्रंथ

भारतीय तत्त्वज्ञान सहा प्रमुख शाळांमध्ये विभागले गेले आहे. न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा आणि वेदांत. या तत्त्वज्ञान शाळांनी ब्रह्मांड, आत्मा, मोक्ष आणि जीवनाच्या उद्देशाबाबत विस्तृत विचार मांडले आहेत. भगवद्गीता, रामायण आणि महाभारत यांसारखे धार्मिक ग्रंथ नीतिमत्ता, धर्म आणि जीवनशैली यांचे मार्गदर्शन करतात.

### 3) आयुर्वेद आणि आरोग्यशास्त्र

आयुर्वेद ही प्राचीन भारतीय वैद्यकशास्त्राची प्रणाली असून चरक महर्षी लिखित चरकसंहिता आणि सुश्रुतसंहिता हे याचे दोन प्रमुख ग्रंथ आहेत. चरकसंहितेमध्ये शरीर, मन आणि आत्मा यांच्या संतुलनावर भर दिला गेला आहे, तर सुश्रुतसंहितेमध्ये शस्त्रक्रिया आणि औषधोपचार यांची सखोल माहिती आहे. आजही आयुर्वेद हे संपूर्ण आरोग्य व्यवस्थेसाठी महत्त्वाचे मानले जाते.

### 4) गणित आणि खगोलशास्त्र

भारतीय गणितज्ञांनी शून्याचा शोध, अंकपद्धती, बीजगणित आणि त्रिकोणमितीमध्ये मौलिक योगदान दिले. आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त, भास्कराचार्य आणि वराहमिहिर यांनी गणित आणि खगोलशास्त्रात महत्त्वाची प्रगती साधली. दशमान पद्धती, पाय (π) मूल्य, ग्रहांच्या गतीचे आकलन आणि सौरमंडळातील सिद्धांत या क्षेत्रांत भारतीय संशोधकांनी मूलभूत तत्त्वे मांडली. भास्कराचार्यांनी आपल्या लाडक्या लेकीला लीलावती ला गणित समजावून सांगण्यासाठी लिहिलेल्या लीलावती ग्रंथामुळे “झाडाला पाने किती असतील हे मोजता येते” असे लोक म्हणायचे.

### 5) योग आणि ध्यान

योग ही भारतीय ज्ञान परंपरेतील एक अत्यंत महत्त्वाची देणगी आहे. पतंजलींच्या योगसूत्रांमध्ये योगाचे आठ अंग (अष्टांग योग) सांगितले गेले असून, ते शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक विकासासाठी उपयुक्त आहेत. मनाच्या स्वास्थ्यासाठी **योग: चित्त निरोध:** अशी व्याख्याच पतंजली ने सांगितली. ध्यान आणि प्राणायाम यांसारख्या तंत्रांचा उपयोग मानसिक स्थिरता आणि तणावमुक्ती यांसाठी केला जातो.

### 6) स्थापत्यशास्त्र आणि वास्तुशास्त्र

भारतातील प्राचीन मंदिर, नालंदा आणि तक्षशीला विद्यापीठांचे स्थापत्य, किल्ल्यांची बांधणी उंचावरही पाणी व्यवस्थापन प्रणाली आणि शहरी नियोजन हे उच्च दर्जाच्या वास्तुशास्त्राचे उदाहरण आहे. वास्तुशास्त्र हे भारतीय

स्थापत्यशास्त्राचे उत्तम शास्त्र असून, ते इमारतींच्या व नगरांच्या उभारणीसाठी निसर्गाच्या आणि पंचतत्त्वांच्या संतुलनावर आधारित आहे.

### संशोधनाची उद्दिष्ट्ये:

१. प्राचीन भारतीय ज्ञान परंपरेचा अभ्यास करणे.
२. प्राचीन भारतीय ज्ञानाचे शिक्षण क्षेत्रातील उपयोजन अभ्यासणे.
३. प्राचीन भारतीय ज्ञानाचे शिक्षण क्षेत्रातील उपयोजनाबाबत झालेल्या संशोधन साहित्याचा आढावा घेणे.
४. भारतीय प्राचीन शिक्षण व्यवस्थेतील आधुनिक बदल अभ्यासणे.

### संशोधनाचे महत्व:

प्राचीन भारतीय ज्ञानाचे शिक्षण क्षेत्रातील उपयोजन हा संशोधन विषय अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण तो भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या मूळ तत्त्वांशी जोडलेला असून आधुनिक शिक्षणाच्या प्रभावी पद्धतींसाठी मार्गदर्शक ठरतो. वेद, उपनिषद, स्मृती, पुराणे आणि तत्त्वज्ञान या ग्रंथांमध्ये शिक्षणाचे विविध पैलू स्पष्ट करण्यात आले आहेत. गुरुकुल शिक्षण प्रणाली आत्मशिस्त, गुरु-शिष्य परंपरा आणि प्रयोगात्मक शिक्षणावर भर देत असे, जे आजच्या कौशल्याधारित शिक्षण प्रणालीस पूरक असे आहे. संस्कृत ग्रंथांमधील गणित, खगोलशास्त्र, आयुर्वेद, वास्तुशास्त्र आणि योग यांसारख्या विद्याशाखा आधुनिक शिक्षणात समाविष्ट केल्यास विद्यार्थ्यांचा बौद्धिक, भावनिक आणि कारक शक्तींचा विकास होऊ शकतो.

आयुर्वेद व योगाच्या अभ्यासामुळे विद्यार्थी तणावमुक्त आणि आरोग्यसंपन्न जीवनशैली अवलंबू शकतात, तर न्याय, वैशेषिक, सांख्य, वेदांत यांसारख्या तत्त्वज्ञान शाखांमुळे विचारसरणी विकसित होऊन संशोधनवृत्तीला चालना मिळते. भारतीय गणित आणि खगोलशास्त्रातील संकल्पना आजच्या तंत्रज्ञानाच्या युगातही उपयुक्त ठरत असून, आर्यभट्ट, भास्कराचार्य, वराहमिहिर यांसारख्या विद्वानांनी दिलेले योगदान आजच्या STEM शिक्षणासाठी प्रेरणादायी ठरते. नालंदा आणि तक्षशिला विद्यापीठे हे प्राचीन भारतातील जागतिक दर्जाची शिक्षण केंद्रे होती, जिथे विविध देशांतील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत असत, यावरून भारतीय शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता दिसून येते. आधुनिक शिक्षण प्रणालीमध्ये या प्राचीन तत्वांचा समावेश केल्यास शिक्षण अधिक सखोल, सर्जनशील आणि आचरणात्मक बनू शकते, तसेच भारतीय मूल्यव्यवस्थेचा प्रचार आणि प्रसारही शक्य होईल त्याचबरोबर ज्ञानयोग आणि कर्मयोग (Learning to Know & Learning to Do) या दोघांमध्ये पडलेली तफावत भरून काढण्यास मदत होईल. सद्य:स्थितीत भेडसावणारा रोजगाराच्या संधीचा प्रश्न सुटून विद्यार्थ्यांच्या हाताला काम मिळेल आणि आत्मनिर्भर विद्यार्थी घडविता येतील. त्यामुळे, प्राचीन भारतीय ज्ञानाच्या शिक्षण क्षेत्रातील उपयोजनाचा अभ्यास हा आधुनिक शिक्षण प्रणाली सुधारण्यासाठी आणि भारतीय शिक्षण प्रणालीला नवसंजीवनी देण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

### संशोधन साहित्याचा आढावा:

प्राचीन भारतीय ज्ञानाचे शिक्षण क्षेत्रातील उपयोजन या विषयावरील संशोधन साहित्याचा आढावा घेतला असता असे लक्षात आले की, अनेक संशोधकांनी यासंदर्भात संशोधन अभ्यास पूर्ण कलेला आहे. उदाहरणादाखल काही संशोधनांचा आढावा –

१. A.L. Basham यांच्या "Ancient Indian Education System" या ग्रंथात गुरुकुल प्रणाली, नालंदा-तक्षशिला विद्यापीठांचे योगदान स्पष्ट करण्यात आले आहे, तर
२. Anant Sadashiv Altekar यांच्या "Education in Ancient India" या ग्रंथात शिक्षणसंस्थांचे स्वरूप आणि विद्यार्थ्यांच्या जीवनशैलीचा अभ्यास करण्यात आला आहे.
३. बंसिबिहारी पंडित व लता मोरे यांच्या “उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण” या पुस्तकात वेद, उपनिषदे, गुरुकुल पध्दतीतील शिक्षण यावर प्रकाश टाकलेला आहे.
४. बंसिबिहारी पंडित व लता मोरे यांच्या “भारतीय शिक्षण व्यवस्थेचा विकास” या पुस्तकात सांख्य दर्शन तसेच विविध आयोग आणि प्राचीन भारतीय तत्वज्ञान याचा आढावा घेण्यात आलेला आहे.
५. Michel Danino यांच्या "The Indian Mind: Fundamentals of Indian Knowledge System" या पुस्तकात प्राचीन भारतीय ज्ञानतत्त्व आणि शिक्षण प्रक्रियेवरील प्रभाव यांचे विश्लेषण आहे.
६. R.K. Mookerji यांच्या "Education in Ancient India" मध्ये प्राचीन शिक्षण संकल्पना, धर्म आणि तत्त्वज्ञान यांचा सखोल अभ्यास आहे. S. Nurullah आणि J.P. Naik यांच्या "History of Education in India" या ग्रंथात वेदकालीन, बौद्ध आणि मध्यकालीन शिक्षण प्रणालीवर प्रकाश टाकण्यात आला आहे.
७. Sahana Singh यांच्या "The Educational Heritage of Ancient India" ग्रंथात भारताच्या ऐतिहासिक शिक्षण परंपरेचे पुनरावलोकन आहे.
८. Y.K. Menon यांच्या "Gurukul System and Its Relevance Today" मध्ये गुरुकुल शिक्षणपद्धतीचे आधुनिक शिक्षण व्यवस्थेशी साधर्म्य सांगितले आहे.

## संशोधन पद्धती:

प्राचीन भारतीय ज्ञानाचे शिक्षण क्षेत्रातील उपयोजन या विषयाच्या संशोधनासाठी मुख्यतः गुणात्मक (Qualitative) आणि ऐतिहासिक (Historical) संशोधन पद्धतींचा वापर केला आहे. संशोधकांनी प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्थेचा सखोल अभ्यास करण्यासाठी साहित्यातील पुनरावलोकन (Literature Review), दस्तऐवजीकरण (Documentary Analysis) यांसारख्या तंत्रांचा अवलंब केला आहे. या पद्धतींचा वापर करण्याचे मुख्य कारण म्हणजे, प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्थेचे दस्तऐवज, ताडपत्रे, शिलालेख आणि ग्रंथ हे प्रामुख्याने उपलब्ध स्रोत होते, ज्यांचा अभ्यास करून त्या काळातील शैक्षणिक तत्वे आणि त्यांची आधुनिक काळातील उपयुक्तता समजून घेणे शक्य झाले आहे. संशोधकाने गुरुकुल प्रणाली, वेदाध्ययन, नालंदा आणि तक्षशिला विद्यापीठांच्या शिक्षणपद्धतींचा देखील सखोल अभ्यास केला आहे.

## माहिती संकलन आणि विश्लेषण:

प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित तथ्यांचे संकलन करून संशोधकाने खालील प्रमाणे माहितीचे विश्लेषण केले आहे.

१. प्राचीन भारतात शिक्षणाचे प्रमुख केंद्र गुरुकुल असायचे, जिथे विद्यार्थी गुरुच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेत असत. विद्यार्जनाची सुरुवात “उपनयन” संस्काराने व्हायची तर सांगता “समावर्तन किंवा उपदान” संस्काराने होत असे. येथे केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर नैतिक मूल्ये, शारीरिक क्षमता, वर्तन कौशल्ये आणि व्यावहारिक शिक्षण दिले जात

असे. आजच्या निवासी शाळा (boarding schools), गुरुकुल आणि समग्र(Holistic) शिक्षण प्रणाली याच परंपरेवर आधारित आहेत.

२. नालंदा आणि तक्षशिला ही जगातील सर्वात प्राचीन विद्यापीठांपैकी होती. येथे वेद, गणित, खगोलशास्त्र, युद्धनीती, आयुर्वेद आणि विविध भाषा मिळून एकूण  कलांचा अभ्यास केला जात असे. त्यामुळे देश-विदेशातील विद्यार्थी येथे शिक्षण घेण्यासाठी येत असत. आजच्या आधुनिक आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा मध्ये समाविष्ठ असलेल्या बहुशाखीय (multidisciplinary) विद्यापीठांची हीच संकल्पना आहे.

३. वेद आणि उपनिषदांमधून जीवनशैली, आत्मज्ञान, तत्व ज्ञान, योग आणि विज्ञान यांचे शिक्षण दिले जात असे. यामध्ये नैतिकता, धर्म, आत्मविकास आणि ब्रह्मज्ञानावर भर दिला जात असे. आजही भारतीय शाळांमध्ये नैतिक शिक्षणाचा आणि संस्कृत ग्रंथांचा अभ्यास केला जातो.

४. भारतीय गणितज्ञ आर्यभट्ट आणि ब्रह्मगुप्त यांनी गणितशास्त्राला अमूल्य योगदान दिले. त्यांनी शून्याची संकल्पना मांडली, दशमान पद्धतीचा विकास केला आणि त्रिकोणमितीचे मूलभूत तत्त्वे दिली. आजच्या गणितशास्त्राच्या अभ्यासक्रमात या संकल्पनांचा मोठा उपयोग केला जातो.

५. सुश्रुतसंहिता आणि चरकसंहितेत वैद्यकीय शिक्षणाच्या संकल्पना विस्ताराने मांडलेल्या आहेत. त्यामध्ये औषधनिर्मिती, शस्त्रक्रिया, आहारशास्त्र आणि प्रकृतीविज्ञान यांचा समावेश होता. आजच्या वैद्यकीय शिक्षणात आयुर्वेद आणि निसर्गोपचार यांचा प्रभाव वाढत आहे.

६. पतंजलींच्या योगसूत्रांमध्ये योगाचे शास्त्रशुद्ध मार्गदर्शन दिले गेले आहे. ध्यान, प्राणायाम आणि आसने यांच्या माध्यमातून मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारले जाते. आधुनिक शाळा आणि कार्यालयांमध्ये योग आणि ध्यानधारणा (meditation) याला महत्त्व दिले जात आहे. याच धर्तीवर २१ जून हा जागतिक योगदिन  संपूर्ण देशभर योगाच्या क्रियांचे आयोजन करून साजरा केला जातो.

७. कौटिल्याने "अर्थशास्त्र" या ग्रंथात प्रशासन, अर्थशास्त्र, व्यापार, धोरण आणि  करप्रणाली यावर प्रकाश टाकला आहे. आजच्या व्यवस्थापन शिक्षणात (Management Studies) याचा उपयोग व्यावसायिक धोरणे आखण्यासाठी केला जातो.

८. संस्कृत ही शास्त्र, गणित, आयुर्वेद आणि योग यांसाठी महत्त्वाची भाषा होती. आधुनिक संगणकीय भाषांवर (Programming Languages) संस्कृतमधील व्याकरणशास्त्राचा प्रभाव दिसून येतो.

९. भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात नाट्य, नृत्य, अभिनय आणि संगीतशास्त्र शिकवले जात असे. आजच्या चित्रपट, नाटक आणि संगीत शिक्षणामध्ये याच शास्त्राचा प्रभाव दिसून येतो.

१०. बौद्ध आणि हिंदू धर्मग्रंथांमध्ये ध्यानाचा वापर मानसिक स्थिरता आणि एकाग्रता वाढवण्यासाठी केला जात असे. आधुनिक मानसशास्त्रात (Psychology) आणि स्ट्रेस मॅनेजमेंट कोर्सेसमध्ये ध्यानधारणेचा वापर केला जातो.

११. प्राचीन भारतात पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी नद्यांचे पूजन, झाडांची पूजा आणि प्राणीसंवर्धनाच्या संकल्पना होत्या. आजही पर्यावरण शिक्षणात (Environmental Studies) या संकल्पनांचा उपयोग केला जातो.

१२. न्याय दर्शन आणि वैशेषिक दर्शन यामध्ये तर्कशास्त्रावर भर दिला जात असे. आजच्या कायद्याच्या अभ्यासक्रमात (Law Studies) आणि डिबेट (Debate) यामध्ये याचा उपयोग केला जातो.

१३. मयमतम् आणि मानसार ग्रंथांमध्ये वास्तुशास्त्राच्या संकल्पना दिल्या आहेत. आधुनिक वास्तुकला आणि सस्टेनेबल आर्किटेक्चर (Sustainable Architecture) मध्ये याच संकल्पनांचा वापर केला जातो.

१४. याज्ञवल्क्य स्मृतीमध्ये सामाजिक मूल्ये, न्यायसंस्था आणि कर्तव्यांची चर्चा केली आहे. आधुनिक कायदा अभ्यासक्रमांमध्ये (Law and Governance) याचा प्रभाव दिसतो.

१५. आर्यभट्ट, वराहमिहिर आणि भास्कराचार्य यांनी पृथ्वीच्या गतीविषयी, ग्रहण आणि तारकासमूहांविषयी संशोधन केले. आजच्या खगोलशास्त्र (Astronomy) आणि अंतराळ संशोधनात याचा प्रभाव आहे.

१६. भगवद्गीता, रामायण आणि महाभारतातून नैतिकता आणि जीवन व्यवस्थापनाचे शिक्षण मिळते. आधुनिक नेतृत्व विकास (Leadership Development) आणि व्यवस्थापन यामध्ये या तत्वज्ञानाचा वापर केला जातो.

१७. भारतीय हस्तकला आणि चित्रकलेला प्राचीन काळात मोठे महत्त्व होते. आजच्या फाइन आर्ट्स आणि डिझाईन अभ्यासक्रमात (Fine Arts and Design) याचा उपयोग केला जातो.

१८. गुरु-शिष्य परंपरेतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवला जात असे. आजच्या कौशल्यविकास (Skill Development) आणि व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षणांमध्ये (Personality Development Training) याचा प्रभाव आहे.

१९. उपनिषद, वेदांत आणि ध्यानधारणेद्वारे आत्मज्ञान, मानसिक स्थैर्य आणि जीवनाचे उद्दिष्ट शिकवले जात असे. आधुनिक मानसिक आरोग्य (Mental Health) आणि जीवनशैली व्यवस्थापन (Lifestyle Management) मध्ये याचा मोठा उपयोग केला जातो.

## निष्कर्ष:

१. प्राचीन भारतीय शिक्षण प्रणाली ही व्यापक, सर्वसमावेशक आणि व्यावहारिक होती. गुरुकुल शिक्षण पद्धतीने विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान दिले नाही, तर त्यांच्यात नैतिकता, आत्मशिस्त, नेतृत्वगुण आणि व्यावहारिक कौशल्ये आणि आत्मनिर्भरता विकसित केली.

२. नालंदा व तक्षशिला यांसारख्या विद्यापीठांमधून बहुशाखीय शिक्षणाचा प्रसार झाला, ज्याचा प्रभाव आजच्या आधुनिक शिक्षण व्यवस्थेत दिसून येतो. वेद, उपनिषदे, आयुर्वेद, योग, गणित, खगोलशास्त्र आणि वास्तुशास्त्र यांसारख्या विविध क्षेत्रांत भारताने मौलिक संशोधन करून जागतिक स्तरावर महत्त्वपूर्ण योगदान दिले.

३. तर्कशास्त्र, नाट्यशास्त्र आणि ध्यानधारणा यासारख्या संकल्पनांचा वापर आजही मानसशास्त्र, कायदे, कला आणि आरोग्य व्यवस्थापनात मोठ्या प्रमाणावर केला जातो.

४. आजच्या काळात प्राचीन भारतीय शिक्षणपद्धतीच्या विचारधारांचा पुनर्विचार आणि उपयोग करणे गरजेचे आहे.

५. संस्कृत भाषेतील तांत्रिक संकल्पनांचा उपयोग संगणकीय विज्ञानात केला जात आहे, तसेच आयुर्वेद आणि निसर्गोपचार आधुनिक वैद्यकीय शिक्षणाचा एक भाग बनत आहेत.

६. पर्यावरण संरक्षण, नैतिक शिक्षण, नेतृत्व विकास आणि ध्यानधारणा यासारख्या संकल्पना आजच्या शैक्षणिक अभ्यासक्रमात समाविष्ट केल्या जात आहेत. त्यामुळे, प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेचा आधुनिक शिक्षण व्यवस्थेवर मोठा प्रभाव असून, ती आजच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रात उपयुक्त ठरत आहे.

**सारांश:**

प्राचीन भारतीय शिक्षण प्रणाली सर्वसमावेशक आणि व्यावहारिक होती. गुरुकुल शिक्षण पद्धतीत शैक्षणिक ज्ञानासोबत नैतिकता, आत्मशिस्त आणि व्यावहारिक कौशल्यांवर भर दिला जात असे. नालंदा व तक्षशिला यांसारख्या विद्यापीठांमध्ये विविध विषयांचे बहुआयामी शिक्षण दिले जात होते. गणित, खगोलशास्त्र, आयुर्वेद, योग, वास्तुशास्त्र, तर्कशास्त्र आणि नाट्यशास्त्र यांसारख्या क्षेत्रांत भारतीय ज्ञानपरंपरेने महत्त्वपूर्ण योगदान दिले.

आधुनिक शिक्षण व्यवस्थेत प्राचीन संकल्पनांचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. संस्कृत भाषेतील व्याकरणशास्त्र संगणक विज्ञानात उपयुक्त ठरत आहे, आयुर्वेद आणि निसर्गोपचार वैद्यकीय शिक्षणाचा भाग बनले आहेत, तसेच पर्यावरणीय तत्त्वे आणि ध्यानधारणा मानसिक आरोग्य व्यवस्थापनात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळे, प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेचा अभ्यास करून त्याचा आधुनिक शिक्षण आणि व्यवसाय व्यवस्थापनात प्रभावीपणे उपयोग करणे आवश्यक आहे.

**संदर्भ:**

१. **Anant Sadashiv Altekar. (1965)"Education in Ancient India". Nand Kishor And Bros, Dharmashala.**

२. **R.K. Mookerji. (1947) "Education in Ancient India". Macmillan and Co. London.**

३. **Sahana Singh. (2017). "The Educational Heritage of Ancient India". E-Book.**

४. बंसिबिहारी पंडित व लता मोरे. (२००६) “उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण”. पिंपळापूरे प्रकाशन,नागपूर.

५. बंसिबिहारी पंडित व लता मोरे. (२००७) “भारतीय शिक्षण व्यवस्थेचा विकास”. पिंपळापूरे प्रकाशन,नागपूर.

६. रामकृष्ण भट्ट. "प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती". नंदकुमार प्रकाशन, पुणे.

७. सुभाष देशमुख. "भारतीय तत्त्वज्ञान आणि शिक्षण". महाराष्ट्र विद्यापीठ प्रकाशन, मुंबई .

८. मंगला कुलकर्णी. "प्राचीन भारतीय विद्यापीठे आणि त्यांचे शिक्षण". ओरिएंट ब्लॅकस्वान, हैदराबाद.

९. शंकर शेटे. "वेद आणि शिक्षण". साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

१०. अंजली जोशी. "आयुर्वेदातील शिक्षण पद्धती". चौखंबा संस्कृत सीरीज ऑफिस, वाराणसी.

११. राजेश पाटील. "योग आणि शिक्षण". कौशिक प्रकाशन, नागपूर.

१२. प्रमोद नाईक. "तंत्रशिक्षणातील भारतीय परंपरा". प्रींटवेल पब्लिशर्स, जयपूर.



**डॉ. उन्नती संजय चौधरी**
**खिरोदा ता. रावेर जि. जळगाव.**